**नि.क्र.११७ वरील आदेशाप्रमाणे वादीतर्फे वटमुखत्यार अनिल सहदेव परब यांचा उलटतपास प्रतिवादी क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री. एल.एल. नाथगोसावी यांचे मार्फत शपथेवर सुरु.**

४७. हे खरे की, माझा दूध विक्रीचा व्यवसाय आहे. हे खरे की, वाडा येथे माझी माड बागायत आहे. हे खरे की, माझ्या प्रमाणेच विलास, महेंद्र, सुधीर, प्रकाश यांची देखील माड बागायत आहे. हे खरे की, या माड बागायतीमध्ये प्रत्येकजण आपआपली मशागत करतो व उत्पन्न घेतो. हे खरे की, माड बागायतीतून उत्पन्न मिळते व त्याची जोपासना करणे आवश्यक आहे. हे खरे की, विलास देखील त्याच्या माड बागायतीची जोपासना करतो व त्यासाठीची मेहनत करतो. विलासला पॅरालिसीसचा झटका आला, तो एका बाजूने अधू झाला व त्याला कमी ऐकू येते याबाबतचा कागदोपत्री पुरावा याकामी दिला नाही. हे खरे नाही की, त्याबाबत विलासवर वैदयकीय उपचार झाले किंवा नाही याबाबत मला माहीती नाही. विलास कानाच्या डॉक्टरांकडे उपचारासाठी गेला होता. त्याने ते उपचार पुर्ण करुन घेतले नाहीत. हे खरे की, माझे व विलासचे बोलणे चालणे होते.

४८. मी कोणत्या कारणाने आज साक्षीसाठी आलो आहे हे मला माहीत आहे. ते कारण मला सांगता येईल. मी दहावी नापास आहे. मला इंग्रजी जास्त येत नाही. विलास देखील दहावी नापास आहे. विलासला इंग्रजी येते का हे मला माहीत नाही. तीस ते बत्तीस वर्षापासून मी व विलास एकत्र आहोत. विलासने कोर्टात हजर केलेला दाखला मी बघितला नाही त्यामुळे वाचण्याचा विषय येत नाही. त्या दाखल्यातील मजकूर मी वाचला नाही. मी दुसऱ्याकडून तो दाखला वाचून घेण्याचा प्रयत्न केला नाही. तो दाखला कोणी मागितला होता याबाबत मला माहीती नाही. हे खरे की, त्या दाखल्यामध्ये कोणाचे नाव नमुद आहे हे मला माहीत नाही. दाखला किती तारखेचा आहे हे मला माहीत नाही. विलासने दिलेल्या मुखत्यारपत्राच्या अनुषंगाने मी विलासकडून माहिती घेतली नाही. हे खरे नाही की, माझे वडील कोणत्या आजाराने वारले हे मला सांगता येणार नाही. हे खरे नाही की, माझ्या वडिलांनी कोणाकडून उपचार घेतले होते हे मला सांगता येणार नाही. मी विलासने दाखल केलेल्या एका कागदाबद्दल साक्षीसाठी आलो हे मला माहीत नाही. हे खरे की, विलासने दाखल केलेल्या कागदाबद्दल जास्त माहिती माझ्यापेक्षा विलासला आहे. हे खरे नाही की, विलासने केलेल्या केसबद्दल मला काही माहिती नाही. हे खरे की, विलास बऱ्याच मागील तारखांना कोर्टात आला होता. हे खरे नाही की, विलासने जाणीवपुर्वक तो खरी साक्ष देऊ शकत नाही म्हणून मला मुखत्यार म्हणून नेमले आहे. हे खरे नाही की, मुखत्यारपत्रातील सर्व मजकूर खोटा आहे. हे खरे नाही की, विलासला त्याने दाखल

केलेल्या कागदपत्रांसबंधीत कोर्टात साक्ष देणे शक्य होते. हे खरे की, या केसची जेवढी माहिती विलासला आहे तेवढी मला नाही. हे खरे नाही की, आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

(श्रीमती एन.बी.घाटगे )

दि. ३०/०४/२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड